सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३६४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना नांदेड समृद्धी महामार्ग व महात्मा फुले मार्केट पुनर्बांधणी संदर्भात मंगळवारी बैठक - आ.अर्जुन खोतकर

जालना । प्रतिनिधी - शेतकऱ्यांचे आंदोलन व जालना शहरातील प्रश्नांबाबत येत्या मंगळवारी (दि १२) मंत्रालयात बैठक होणार असल्याची माहिती आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली आहे. विशेष म्हणजे या बैठकीच्या नंतर कोणतीही बैठक होणार नसल्याचे सांगत एकप्रकारे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर टोला लगावला आहे. माजी आमदार गोरंट्याल यांनी नुकतेच त्यांच्या उपस्थितीत येत्या २१ ऑगस्ट रोजी बैठक होणार असल्याचे म्हटले होते.

जालना नांदेड समृद्धी महामार्गासाठी गेल्या शंभर दिवसापासून देवमूर्ती येथे आंदोलन सुरू आहे या आंदोलनासाठी व जालना शहराच्या महात्मा फुले मार्केट पुनर्बांधणी ,जालना सिडको, शहरातील झोपडपट्टी धारकांना पि. आर. कार्ड देणे बाबत आमदार अर्जुन खोतकर यांनी तीन दिवसापूर्वी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार अर्जुन खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र काही कारणास्तव ही बैठक रद्द करण्यात आली होती. आता ही बैठक कॅबिनेटच्या दिवशी मंगळवार (दि १२) रोजी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार अर्जुन खोतकर व सर्व संबंधित अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालय मुंबई आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला जालना नांदेड समृद्धी महामार्गाचे शेतकरी आंदोलक दिलीप राठी यासह शेतकरी व्यापारी उपस्थित राहणार आहे, यानंतर बैठक होणार नाही अशी माहिती आमदार अर्जुन खोतकर यांनी दिली आहे ३५ हजार मताने मी निवडून आलोय जालन्याच्या जनतेचा मूड आम्हाला माहिती आहे, असा टोला आमदार अर्जुन खोतकर यांनी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर लगावला आहे. महानगरपालिका ताब्यात घेण्यासाठी लोकशाहीमध्ये बोलण्याचा अधिकार असल्याचेही आमदार अर्जुन खोतकर यांनी म्हटले आहे. यावेळी शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले, शिवसेना संपर्कप्रमुख पंडित भुतेकर, दिनकर घेवंदे आदींची उपस्थिती होती.




## मातोश्री रमाबाई नगर येथे विविध विकास कामाचे आ.अर्जुन खोतकर यांच्या हस्ते उदघाटन



मातोश्री रमाबाई नगर येथे ऐतिहासिक करुणा बुद्ध विहार इथे विविध विकास कामाचा उद्घाटन जालन्याचे आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख पंडित भुतेकर, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, दिनकर घेवंदे, नगरसेवक निखिल पगारे, संजय डुकरे पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी जालनाचा विकासासाठी शिवसेना पक्षाच्या वतीने येणाऱ्या मनपि निवडणूक मध्ये विष्णू पाचफुले पहिले महापौर पदाचे उमेदवार म्हणून राहणार आहेत. दिवाळीनंतर जालनेकरांना रोज पाणी देण्याची जबाबदारी आमची आहेअसुन यासंदर्भात काम सुरु आहे. असे प्रतिपादन आमदार खोतकर यांनी केले आहे. येणाऱ्या जालना महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेचा झेंडा फडकणार आहे. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या ओट्याचे सुशोभीकरण, रंगरंगोटी, झाडे लागवड, खुले सभागृह अशा विविध विकास कामाचं उद्घाटन आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन दिनकर घेवंदे यांनी केले होते. यावेळी शंकरराव घेवंदे, विनोद खरात, कैलास सराफ, संजय डुकरे, लक्ष्मण साबळे, अजमद भाई, रहमान भाई दीपा म्हस्के, ज्योती घेवंदे, ज्योती जाधव,सिंधू खरात, लक्ष्मी सरकटे, माया घेवंदे, मंगल बनकर, वैशाली बनसोडे, सनी घेवंदे, शुभम घेवंदे, अभिषेक घेवंदे आदींसह स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## प्रसिध्द व्याख्याते वसंत हंकारे यांचे जालन्यात व्याख्यान

खा. डॉ. कल्याण काळे आयोजन



**जालना । प्रतिनिधी -** आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून सर्वांना खळखळून हसविणारे आणि रडविणारे महाराष्ट्रातील प्रसिध्द व्याख्याते श्री वसंत हंकारे सर हे जालना शहरात प्रथमच येत असून त्यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता श्री. म. स्था. जैन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर, जालना या ठिकाणी होत आहे. खा. डॉ. कल्याण काळे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. स्व. वैजिनाथराव काळे स्मृती प्रतिष्ठाण द्वारा या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. आई-वडील, मुलं-मुली यांच्या नात्यातील सुंदर व्याख्या सांगणारे प्रभावी व्याख्याते वसंत हंकारे यांचे काळजाला भिडणारे व्याख्यान जालनेकरांसाठी आयोजित करण्यात आले आहे. आई-बाप समजून घेतांना आजच्या तरुण पिढीला व विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखविणारे हे व्याख्यान आहे. त्यामुळे या व्याख्यानाला जालनेकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन स्व. वैजिनाथराव काळे स्मृती प्रतिष्ठाण चे अध्यक्ष खा. डॉ. कल्याणराव काळे, सचिव भाऊसाहेब बापू काळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### युवा आदर्श

### मन मोकळे ...

द्या वैधानिक इशारा
सगळे झाले मोकळे
जाहिरातीवरी श्रध्दा
विश्वास ठेवी निर्मळे
बारीक अस्पष्ट अक्षरे
अटींचा अर्थ ना कळे
सल्लागारांवर विसंबे
आम्ही निर्बुद्ध ठोकळे
इशारा देऊन सरकार
ते झाले नामानिराळे
जाहिरातीवर विश्वास
उडवत बसे भुसनाळे
सुपरस्टार झळकले
सल्ले देतात आगळे
गुंतवणूकीत जोखीम
चित्र विचित्र ते वेगळे
पैसे मुश्किले जोडून
बचत करतात भोळे
सल्लागार रे टपलेले
खिळे खिशावर डोळे
कमाई लावी जुगारी
डोक्या मातीचे गोळे
शेअर बाजार कोसळे
तेंव्हाचं गडबडा लोळे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## राज्यस्तरीय मर्दानी खेळ स्पर्धेत जालन्याच्या नवदुर्गा आखड्याचा तिसरा क्रमांक

रुद्राक्ष यादव व हर्षवर्धन गौरक्षक यांची चमकदार कामगिरी




**जालना । प्रतिनिधी -** ७९ व्या स्वातंत्र्यदिना निमित्त मा. निलेश तापकिर फाउंडेशनतर्फे १० ऑगस्ट २०२५ रोजी पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय मर्दानी खेळ स्पर्धेत जालन्याचा नवदुर्गा पहिला मर्दानी खेळ आखडाने राज्यभरातून आलेल्या खेळाडूंमध्ये तिसरा क्रमांक पटकावत यशाची परंपरा कायम ठेवली.

या स्पर्धेत रुद्राक्ष भूषण यादव व हर्षवर्धन राजेंद्र गौरक्षक यांनी वस्ताद भूषण यादव यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट खेळ कौशल्य दाखवत मर्दानी खेळात आपले वर्चस्व सिद्ध केले.

समारंभाला मा. निलेश तापकिर, अरविंद सालवे, आर्यन मेठे, संजय बनसोडे, सौ. स्मिता धीवर, रवि अडागळे, गणेश चखाले यांच्यासह पुण्यातील प्रतिष्ठित व्यक्ती, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नोटरींच्या कामात कायद्याचे पालन आणि शिस्तबद्धता अपेक्षित - न्या. प्रसन्न वराळे

**जालना । प्रतिनिधी -** नोटरींचे कार्य हे नोबल असून, शिस्तबद्धता व कायद्याचे काटेकोर पालन आवश्यक आहे. बदलत्या काळात माहिती-तंत्रज्ञानाचा जागरूक वापर करणेही अपेक्षित आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांनी केले.

पुण्यातील चिंचवडमधील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात शनिवार (ता. ९) महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनतर्फे पाचवी नोटरी परिषद पार पडली, त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून न्या. वराळे बोलत होते. परिषदेची सुरुवात संविधान दिंडीने झाली. या वेळी उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, न्यायमूर्ती संदीप व्ही. मारणे, न्यायमूर्ती आरिफ एस. डॉक्टर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश पुणे एस. के. महाजन, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, ॲड. राजेंद्र उमाप, ॲड. पांडुरंग थोरवे, ॲड. संजय दातीर पाटील, माजी न्यायाधीश हाजी सय्यद अजमत अली, ॲड. रवी गायकवाड, ॲड. अशोक ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी न्या. रेवती मोहिते-डेरे म्हणाल्या की, ऑनलाइन, डिजिटल नोटरी वर्कबाबत नोटरींच्या कार्यशाळा वेळोवेळी होणे अपेक्षित आहे. ॲड. खराडे यांनी संघटनेचे उद्दिष्ट, कार्यपद्धती व मागील काळात केलेल्या कामाचा आढावा घेतला.

या परिषदेत नोटरी पदाचा दर्जा, व्यावसायिक सक्षमता, तांत्रिक सुधारणा यावर मार्गदर्शन झाले. १५ नोटरी वकिलांना विधी सेवा पुरस्कार देण्यात आले. परिषदेत वकिलांच्या कामकाजाशी निगडित महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले, त्यात वकिलांचे नोटरी सर्टिफिकेट व रिन्यूअल विनाविलंब करावे, नोटरी वकिलांना बसण्यासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देणे, पोलिसांनी नोटरी क्टअंतर्गत मिळालेल्या संरक्षणात बाधा येणार नाही याची दक्षता घेणे, वकील संरक्षण कायदा मंजूर करण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करणे, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुणे येथे होणे, नोटरी वकिलांना ओळखपत्र देणे, टोलमाफी, इन्शुरन्स फॅसिलिटी मिळणे, खोटे गुन्हे दाखल करण्यात येऊ नये, या ठरावांचा समावेश आहे.

या परिषदेत जालना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत, ॲड. अशोक छाजेड, ॲड. आर. बी. मोरे, ॲड. वैभव खरात, ॲड. राजेंद्र चव्हाण, ॲड. शिवराम सतकर , महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे पान २ वर

## देवगाव येथील संत सेवा नगर तांडा वस्तीसाठी गावठाण विस्ताराची मागणी

महसुलमंत्री बावनकुळे यांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** येथील ग्राम संसद कार्यालयाने महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देऊन मौजे देवगाव येथील गट क्रमांक ९२ मधील संत सेवा नगर तांडा वस्तीसाठी गावठाण विस्ताराची मागणी केली आहे. या पत्रात तांडा वस्तीला १९८५ मध्ये २० आर जमीन गावठाणसाठी मिळाल्याचे नमूद करण्यात पान २ वर

## इंडियाज टॅलेंट फायटसाठी जालन्यातील अवेश हमीद खान यांची निवड

मेगा ऑडिशनमध्ये उत्कृष्ट कामगिरी; जालना शहरात अभिनंदनाचा वर्षाव

**जालना । प्रतिनिधी -** भारतातील सर्वात मोठ्या रिॲलिटी शो इंडियाज टॅलेंट फायटसाठी जालना शहरातील मोदीखान्यातील अवेश हमीद खान यांची निवड झाली आहे. ही निवड ३ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या मेगा ऑडिशनमधून झाली.

सदरील ऑडिशन शेफिल्ड इंटरनॅशनल स्कूल, पिरान कलियर, हरिद्वार (उत्तराखंड) येथे पार पडले. राष्ट्रीय स्तरावरील या टॅलेंट शोमध्ये सर्व वयोगटातील गायक, नर्तक, मॉडेल्स, रॅपर्स यांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते.

मेगा ऑडिशनमध्ये अवेश हमीद खान यांनी दिलेल्या प्रभावी सादरीकरणामुळे त्यांची निवड करण्यात आली. या यशाबद्दल जालना येथे माजी नगरसेवक विष्णु वाघमारे, विकी वाघमारे, मुजीब बिल्डर, आदिल खान, रईस भाई आणि इतर मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.



# संपादकीय

## भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची उद्या म्हणजे १२ ऑगस्ट रोजी जयंती. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून देणारा तरुण क्रांतीकारक - खुदीराम बोस

खुदीराम बोस ! भारतातील सर्वात तरुण वयाचा क्रांतीकारक म्हणून ओळखला जाणारा हा वीर. हिंदुस्थानवर जुलमी सत्ता गाजवणार्या ब्रिटीश साम्राज्यावर ज्यांनी अलौकिक धैर्याने पहिला बॉम्ब फेकला, शालेय जीवनातच वन्दे मातरम् या पवित्र मंत्राने भारावून ज्यांनी भारतभूच्या स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून दिले त्या खुदीराम बोस यांचा ११ ऑगस्ट या दिवशी बलिदानदिन साजरा केला जातो. ११ ऑगस्ट १९०८ या दिवशी वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी हातात भगवद्गीता घेऊन खुदीराम बोस यांनी फाशीच्या खांबाला आलिंगन दिले.

**खुदीराम बोसने सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करणे !**

काळ होता १९०३ चा ! बंगाल प्रांताचे विभाजन करण्याचे ब्रिटीश सरकारने निश्‍चित केले. त्यामुळे सर्वसामान्य लोकांमध्ये नाराजीची तीव्र लाट पसरली. खुदीरामलाही बंगालच्या फाळणीचा निर्णय अन्यायकारक वाटला. देशासाठी काहीतरी करावे, असे सारखे वाटू लागल्याने मेदिनीपूर येथे थोडेफार शिक्षण झाल्यावर त्याने सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करला. सरकारच्या विरुद्ध आंदोलने करणार्यांना पकडून कठोर शिक्षा देण्यात येऊ लागल्या.

**राजद्रोहाच्या आरोपातून निर्दोष सुटणे**

फेब्रुवारी १९०६ मध्ये मिदनापूर येथे एक औद्योगिक आणि शेतकी प्रदर्शन भरले होते. हे प्रदर्शन पहाण्यास आजूबाजूच्या प्रांतांतून शेकडो लोक येऊ लागले. बंगालमधील एक क्रांतीकारक सत्येंद्रनाथ




यांनी लिहिलेल्या सोनार बांगला या जहाल पत्रकाच्या प्रती खुदीराम यांनी या प्रदर्शनात वाटल्या. पोलीस शिपाई त्यांना पकडण्यासाठी धावला. खुदीराम यांनी या शिपायाच्या तोंडावर ठोसे मारले आणि शिल्लक राहिलेली पत्रके काखेत मारून ते त्याच्या हातून निसटून गेले. या प्रकरणी राजद्रोहाच्या आरोपावरून सरकारने त्यांच्यावर अभियोग भरला; परंतु खुदीराम त्यातून निर्दोष सुटले.

**न्यायाधीश किंग्जफोर्डला ठार मारण्याच्या कामगिरीसाठी निवड होणे**

मिदनापूर येथे युगांतर या क्रांतीकारकांच्या गुप्त संस्थेच्या माध्यमातून खुदीराम क्रांतीकार्यात ओढले गेले. वर्ष १९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली. या फाळणीच्या विरोधात असणार्या अनेकांना त्या वेळचा कलकत्त्याचा मॅजिस्ट्रेट किंग्जफोर्ड याने क्रूर शिक्षा ठोठावल्या होत्या. अन्य प्रकरणांतही त्याने क्रांतीकारकांना खूप छळले होते. याच सुमारास किंग्जफोर्डला बढती मिळून तो मुझ्झफरपूर येथे सत्र न्यायाधीश म्हणून कामावर रुजू झाला. सरतेशेवटी युगांतर समितीच्या एका गुप्त बैठकीत किंग्जफोर्डलाच ठार मारायचे ठरले. यासाठी खुदीराम आणि प्रफुल्लकुमार चाकी यांची निवड करण्यात आली.

खुदीराम यांना एक बॉम्ब आणि पिस्तूल देण्यात आले. प्रफुल्लकुमार यांनाही एक पिस्तूल देण्यात आले. मुझ्झफरपूरला आल्यावर या दोघांनी किंग्जफोर्डच्या बंगल्याची टेहळणी केली. त्यांनी त्याची चारचाकी आणि तिच्या घोड्याचा रंग पाहून घेतला. खुदीराम तर त्याच्या कार्यालयात जाऊन त्याला नीट पाहूनही आले.

३० एप्रिल १९०८ या दिवशी हे दोघे नियोजित कामगिरीसाठी बाहेर पडले आणि किंग्जफोर्डच्या बंगल्याबाहेर घोडागाडीतून त्याच्या येण्याची वाट पाहू लागले. बंगल्यावर टेहळणीसाठी असलेल्या दोन गुप्त अनुचरांनी त्यांना हटकले; पण त्यांना योग्य ती उत्तरे देऊन ते तेथेच थांबले.

**हिंदुस्थानातील पहिला बॉम्ब फेकण्याचा बहुमान मिळणे**

रात्री साडेआठच्या सुमारास क्लबकडून किंग्जफोर्डच्या गाडीशी साम्य असणारी गाडी येतांना दिसताच खुदीराम गाडीमागून धावू लागले. रस्त्यावर खूपच अंधार पडला होता. गाडी किंग्जफोर्डच्या बंगल्यासमोर येताच त्यांनी दोन्ही हातांनी बॉम्ब वर उचलला आणि नेम धरून अंधारातच पुढील चारचाकीवर जोराने आदळला. हिंदुस्थानातील या पहिल्या बॉम्बस्फोटाचा आवाज त्या रात्री तीन मैलांपर्यंत ऐकू गेला आणि काही दिवसांतच त्याचा आवाज इंग्लंड, युरोपलाही ऐकू गेला.

खुदीराम यांनी किंग्जफोर्डची गाडी समजून बॉम्ब टाकला होता; पण त्या दिवशी तो थोड्या उशिराने क्लबबाहेर पडल्यामुळे वाचला. दैवयोगाने गाड्यांच्या साधर्म्यामुळे दोन युरोपियन महिलांना आपले प्राण गमवावे लागले. रातोरात खुदीराम आणि प्रफुल्लकुमार दोघेही २४ मैलांवरील वैनी रेल्वे स्थानकापर्यंत अनवाणी धावत गेले.

**धैर्याने आणि आनंदी वृत्तीने फाशी जाणे**

दुसर्या दिवशी संशयावरून प्रफुल्लकुमार चाकी यांना पोलीस पकडण्यासाठी गेले, तेव्हा त्यांनी स्वतःवर गोळी झाडून घेतली आणि प्राणार्पण केले. खुदीराम यांना पोलिसांनी अटक केली. या अटकेचा शेवट ठरलेलाच होता. ११ ऑगस्ट १९०८ या दिवशी भगवद्गीता हातात घेऊन खुदीराम धैर्याने आणि आनंदी वृत्तीने फाशी गेले.

किंग्जफोर्डने घाबरून नोकरी सोडली आणि ज्या क्रांतीकारकांना त्याने छळले, त्यांच्या भीतीने तो लवकरच मरण पावला, त्याचे नावनिशाणही उरले नाही.

खुदीराम मात्र मरूनही अमर झाले !!

**संकलक : कु. प्रियांका लोणे,**
**मराठवाडा संघटक,**
**हिंदु जनजागृती समिति,**
**संपर्क क्र.: ८२०८४४३४०१**

# ग्रोव्हिजन गटशेती संघ भराडखेड्यात चर्चासत्र: अनुभवली खजूर शेती

**जालना । प्रतिनिधी -** ग्रोव्हिजन गटशेती संघांचे नियमित मासिक चर्चासत्र बदनापूर तालुक्यातील भराडखेडा येथे शनिवार ( दि. ९ ऑगस्ट ) रोजी संपन्न झाले. यावेळी उपस्थितांनी खजूर शेती जाणून घेतली. श्री. भानुदास घुगे यांच्या शेतावर शिवारफेरी झाली. घुगे यांनी या खजूर शेती बाबत उपस्थितांना ईतंभूत माहिती देऊन या शेतीतीतून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी जमीन, लागवड तंत्रज्ञान, रोपे, घ्यावयाची काळजी, विक्री व्यवस्थेतबाबत अवगत केले.



ग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख संजय मोरे पाटील यांनी ग्रोव्हिजन गटशेती संघ करत असलेल्या कार्याची यावेळी माहिती दिली. इटा येथील डॉ. सोमीनाथ वनार्से, टाकळी माळीचे गणेश बुरकूल, वरुडीचे श्री. जयकिसन शिंदे, पुणे जिल्ह्यातील निंबूनचे शशिकांत काकडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बारामतीचे अजित जगताप, दौडचे रामदास शितोळे, अशोक निंबाळकर, सचिन नागरे यांची यावेळी उपस्थिति होती.

# भारतीय सेनेचे जवान स्व. अमोल पंडित दळवी यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट



**भोकरदन । प्रतिनिधी** - तालुक्यातील बोरगाव जहांगीर येथील भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले स्व. अमोल पंडित दळवी हे सुट्टीवर घरी आले असताना त्यांचे नुकतेच अपघाती निधन झाले, त्या पार्श्वभूमीवर आज महसूल मंत्री माननीय नामदार श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे व माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे दादा यांच्या समवेत दळवी कुटुंबीयांची भेट घेतली.

यावेळी शोकाकुल दळवी कुटुंबीयांचे मंत्री महोदय यांनी सांत्वन करत धीर दिला व महायुती सरकार त्यांच्या परिवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली. याप्रसंगी भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ग्रोव्हिजन गटशेती संघाला आंबा राज्य संघाने केले सन्मानीत

जालना । प्रतिनिधी - जिल्ह्यातील ग्रोव्हिजन गटशेती संघाला महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या वतीने गुरुवारी ( दि. ७ ऑगस्ट ) सन्मानीत करण्यात आले आहे.




मुंबई येथील बी. के. सी. बांद्राच्या राष्ट्रीय शेअर बाजार ( एन. एस. ई.) येथील आर. एच. पाटील सभागृहात महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघांचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत मोकल यांच्या हस्ते ग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील, सौ. संगीता मोरे पाटील, श्री. गणेश बुरकूल यांनी हा सन्मान स्वीकारला.

यावेळी सोमय्या विद्याविहार विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. (डॉ.) व्ही.एन. राजशेखरन पिल्लई, भारतीय कृषी अनुसंधान परिषद ( ICR ) चे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अशोक कुमार, न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी ली.चे जनरल मॅनेजर श्री. एस. दिनकरन, ई.सी.जी.सी.चे डेप्युटी जनरल मॅनेजर, भारत सरकार श्री. राहुल सी., कृषी सहसंचालक श्री. बालाजी ताटे, पीडीलाईटचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. पी के शुक्ला, धनश्री क्रॉप सोलुशनचे प्रमुख श्री. महेश दामोदरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# श्री विठ्ठल प्राथमिक व माध्यमिक शाळेत रक्षाबंधनाचा कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील चंदनझीरा येथे आज दि.०९ शनिवार रोजी सकाळी आकरा वा. श्री विठ्ठल बालक मंदिर, गिरीष लिटील स्टार नर्सरी, गिरीष इंग्लिश स्कूल तसेच श्री विठ्ठल प्राथमिक व माध्यमिक शाळेत रक्षाबंधनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची अध्यक्षता शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शुभांगीताई येमुल मडम यांनी केली. सर्वप्रथम त्यांच्या हस्ते सरस्वती मातेमच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांच्या हातावर प्रेमाने राखी बांधून बंधुभाव आणि आपुलकीचे नाते दृढ केले. मुख्याध्यापिका श्रीमती येमुल मडम यांनी सर्व विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा देत बंधु-भगिनींच्या प्रेम, आपुलकी आणि परस्पर सहकार्याच्या महत्त्वावर थोडक्यात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन शिक्षकवर्गाने केले तर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांद्वारे सणाचे महत्त्व उलगडून दाखवले. शेवटी मुख्याध्यापिकांच्या अध्यक्षीय समारोपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

पान १ वरुन

## नोटरींच्या कामात ...

प्रवक्ते ॲड. पठाण साजीदखान अब्दुल मजीदखान, सदस्य ॲड. नसीर नजीरखान पठाण यांनी सहभाग नोंदवला.

परिषदेच्या यशस्वीतेसाठी कार्यवाह ॲड. आतिश लांडगे, महिला अध्यक्ष ॲड. शोभा कड, ॲड. ज्योती पांडे, ॲड. आशिष ताम्हणे, एम. ए. सईद आदींनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन ॲड. आस्मा शेख यांनी केले.

## देवगाव येथील ...

आले आहे. सध्या या वस्तीमध्ये लोकसंख्या वाढल्याने मोठ्या प्रमाणावर घरे बांधली गेली आहेत. शासनामार्फत या ठिकाणी रस्ते, वीज, पाणी तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मंदिर, मस्जिद, चर्च आणि वैद्यकीय सुविधांसारखे बांधकामही करण्यात आले आहे. याशिवाय, सामाजिक सभागृहसुद्धा बांधले गेले आहे.

पत्रानुसार, वाढलेल्या लोकसंख्येमुळे आणि वस्तीच्या विकासासाठी गावठाण विस्तार करण्याची तातडीची गरज आहे. त्यामुळे संत सेवा नगर तांडा वस्तीसाठी गावठाण विस्तार मंजूर करण्याची विनंती शासनाकडे करण्यात आली आहे.

या पत्रावर सरपंच सौ. पूजा सचिन मनटे आणि उपसरपंच श्री. पटेल इद्रीस शे. मेहबूब यांच्यासह ग्राम सेवक श्री. वि. डि. गायकवाड यांची नावे आहेत. पत्रावर दिनांक ०९/०४/२०२५ ची नोंद आहे.

या मागणीमुळे या तांडा वस्तीतील रहिवाशांना मोठ्या प्रमाणात फायदा होण्याची अपेक्षा आहे. प्रशासनाने यावर लवकरच योग्य निर्णय घ्यावा अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# जाफ्राबादमध्ये 'हरित महाराष्ट्र - समृद्ध महाराष्ट्र' व 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत मोफत रोपे वाटप

## नगरोत्थान महाभियानांतर्गत वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून जनजागृती

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** नगरोत्थान महाभियानाच्या हरित महाराष्ट्र - समृद्ध महाराष्ट्र व 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत जाफ्राबाद तालुक्यात मोफत रोपे वाटप करून वृक्षारोपणाचे महत्त्व विषद करण्यात आले. या उपक्रमातून नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमास खासदार डॉ. कल्याण काळे, माजी खासदार रावसाहेब दानवे, आमदार संतोष दानवे, नगराध्यक्षा नगर पंचायत जाफ्राबाद सौ. सुरेखाताई लहाने, परि. आयएएस डॉ. बी. सर्वानन, तहसीलदार सारिका भगत यांच्या हस्ते रोपे वाटप करण्यात आले. या प्रसंगी वन परिक्षेत्र अधिकारी (सामाजिक वनीकरण), जाफ्राबाद स्वप्निल पवार, योगेश विटोरे, वनरक्षक विजय राठोड यांच्यासह जाफ्राबाद परिसरातील नागरिक व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना प्रहारच्या वतीने निवेदन





**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील प्रहार प्रहारच्या वतीने राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विविध मागण्यासाठी निवेदन देण्यात आले. जाफराबाद येथील पाणीपुरवठा योजनेसह विविध कामाच्या उद्घाटसाठी नियोजित दौऱ्यावर आले असताना होता, प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष यांच्या नेतृत्वात संघटनेच्या कार्यकर्त्यांनी बावनकुळे साहेबांचा ताफा आडवून तालुका अध्यक्ष एकनाथ शिंदे यांनी आपल्या स्वतःच्या रक्तांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांच्या वेदना व दिव्यांग निराधार यांच्या व्यथा यासह शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात निवेदन दिले.

यावेळी प्रहार जिल्हाध्यक्ष दिव्यांग संघटना जालना रवींद्र अंभोरे, तालुका अध्यक्ष सुनील पाटील पंडित, दिव्यांगचे तालुकाध्यक्ष एकनाथ शिंदे, उपाध्यक्ष अरुण जंजाळ, जिल्हा संघटक शरद पंडित, सचिव सिद्धेश्वर वर्गने, अमोल पवार, अमोल शिंदे,कृष्णा वाघमारे, पंढरी मस्के,तानाजी पंडित, रुपेश पंडित,मनोहर जंजाळ, यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र स्वराज्य पक्षाची रायगड जिल्हा युवक कार्यकारिणी जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी -** महाराष्ट्र स्वराज्य पक्षप्रमुख छत्रपती संभाजीराजे महाराज यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य पक्षाचे नेते सरचिटणीस धनंजय भाऊ जाधव स्वराज्य पक्षाचे नेते उपाध्यक्ष अंकुश कदम बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा युवक कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.यावेळी अँड ओमकार विठ्ठल जाधव- रायगड जिल्हा युवक अध्यक्ष,अजित घाडगे - रायगड जिल्हा उपाध्यक्ष,अमित शिर्के - रायगड जिल्हा युवक सचिव,दिनेश काळंगे - रायगड जिल्हा युवक सहसचिव,मनोहर पाटील - रायगड जिल्हा युवक संघटक,सचिन माने - रायगड जिल्हा युवक उपसंघटक,ऋषिकेश घुले - रायगड जिल्हा युवक उपसंघटक इत्यादी सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांची रायगड जिल्हा युवक कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.यावेळी सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांचे मुंबई विभाग युवक अध्यक्ष संतोष कदम यांनी मनःपूर्वक अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा देत आपण हेवा वाटावा असे कार्य करून गाव तिथं शाखा घर तिथं स्वराज्य या संकल्पनेतून छत्रपती संभाजीराजे महाराज यांचे विचार व पक्षाचे कार्य घराघरात पोहचण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न कराल असा विश्वास आहे असे मत महाराष्ट्र स्वराज्य पक्ष मुंबई विभाग युवक अध्यक्ष संतोष कदम यांनी व्यक्त केले.



# जालना गणेश फेस्टीवलच्या संपर्क कार्यालयाचे संतोष खांडेकर यांच्या हस्ते उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** जालना गणेश फेस्टीवलच्या संपर्क कार्यालयाचे आज रविवारी जालना शहर महापालिकेचे आयुक्त श्री. संतोषराव खांडेकर यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी, क्रिडाईचे माजी अध्यक्ष श्री अभय कुलकर्णी, जालना मर्चंट बँकेचे माजी अध्यक्ष श्री अंकुश राऊत तसेच श्री जगत घुगे, महायीर ढक्का, उध्दव पठाडे, सुधाकर पवार, अच्चुतराव कदम, दिगंबरराव पेरे, धनुभाऊ काबलिये, गणेश सुपारकर यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांचे स्वागत फेस्टीलतर्फे पुष्पहार देऊन करण्यात आल्यानंतर प्रास्ताविक फेस्टीवलचे अध्यक्ष श्री.अशोकराव आगलावे यांनी केले. ते म्हणाले की, फेस्टीवलचे हे रौप्य मोहत्सवी वर्षे असून यावर्षी देखील अत्यंत कार्यक्रम घेण्याचा आपला मानस असून स्टेडियमच्या अडचणी श्री. खांडेकर सोडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. तर कार्यक्रमाचे उद्घाटक श्री. संतोषराव खांडेकर म्हणाले की, गत वर्षीपेक्षाही यावर्षी देखील थोड्या जास्तच सुविधा महापालिकेतर्फे देण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे. ते म्हणाले की, यंदा गणेश विसर्जनासाठी महापालिकेतर्फे विशेष व्यवस्था करण्यात आली असून बहुतेक करुन हा महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रकल्प असेल, असेही शेवटी श्री. खांडेकर म्हणाले. याप्रसंगी फेस्टीवलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील तसेच माजी अध्यक्ष राजेंद्र गोरे, दिनेश फलके, किरण गरड, शरद देशमुख, माजी अध्यक्ष अ‍ॅड. किनगावकर, सुभाषराव कोळकर, अशोकराव उबाळे, संताजी वाघमारे, अजिंक्य घोगरे, सुरेश मुळे तसेच अवनिश गरड, राजेंद्र हुसे, गणेश चांदोडे, अविनाश भंडे, संजय देशमुख आदींसह गणेश भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. राजेंद्र भोसले यांनी तर उपस्थितांचे आभार राजेंद्र गोरे यांनी मानले.





## जालना जिल्हा संघटक पदी विठ्ठलराव बरकुले यांची नियुक्ती



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील खांडवी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तडफदार व पक्षावर प्रेम करणारे विठ्ठलराव बरकुले हे सातत्याने गेल्या वीस पंचवीस वर्षांपासून कार्यकर्ते म्हणून पक्षाचे काम करत आहेत.परतूर तालुक्यात केलेल्या पक्ष कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर विश्वास ठेवून जिल्हा संघटक पदाची जिम्मेदारी दीली आहे.त्यांनी आतापर्यंत केलेल्या कामाची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस जालना जिल्हा संघटक पद दिले आहे.जिल्हा अध्यक्ष अरविंद अण्णा चव्हाण यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन बरकुले यांना सन्मानित करण्यात आले. जिल्हा अध्यक्ष अरविंद अण्णा चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस बळकट करण्यासाठी व पक्ष वाढीसाठी जिल्ह्यासह तालुक्यात एकजुटीने पक्ष मोठा करण्याचा प्रयत्न करु. यावेळी पद्माकरजी हांडे. सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश सहसचिव, रमेश पाईकराव. जालना तालुका अध्यक्ष,ढेगळे यांनी विठ्ठलराव बरकुले यांना अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## निवडणूक आयोगाची नोटीस

**नवी दिल्ली -** दोन दिवसांपूर्वी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाने भाजपाशी हात मिळवणी करत निवडणूक मॅनेज केल्याचा आरोप केला होता. अंपायरच भाजपाशी हातमिळवणी करत असेल तर काय करणार? असाही सवाल त्यांनी केला होता. दरम्यान त्यांनी शकुन राणी यांना निवडणूक आयोगाने कसं डबल व्होटर केलं हे उदाहरणासह स्पष्ट करुन दाखवलं होतं. त्यावरुन आता निवडणूक आयोगाने राहुल गांधींना नोटीस बजावली आहे. एवढंच नाही तर राहुल गांधींचे दावे दिशाभूल करणारे आहेत असंही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

# अनुदान घोटाळ्यावर लोणीकर आक्रमक; महसूल मंत्र्यांचे तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश

### अंबड - घनसावंगीतील संभाव्य १०० कोटींचा घोटाळा

**जालना । प्रतिनिधी -** अंबड व घनसावंगी तालुक्यामध्ये बोगस अनुदान वाटपाचा घोटाळा आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून उघडकीस आला असून हा घोटाळा १०० कोटी रुपयांपर्यंत असू शकतो अशी तक्रार आमदार बबनराव लोणीकर यांनी पहिल्याच दिवशी शासन व प्रशासनाकडे केली होती. उपरोक्त रक्कम दोन्ही तहसीलदारांच्या लॉगिन आयडी व पासवर्ड वापरून बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नावे पाठवण्यात आली आहे, ही बाब अत्यंत गंभीर असून आतापर्यंत ७४ लोकांवर या संदर्भाने कारवाई होणे अपेक्षित असताना केवळ २१ तलाठ्यांची निलंबन करण्यात आले आहे. ही बाब आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या बैठकीदरम्यान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास आणून दिली व दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ फौजदारी स्वरूपाची गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी केली. या मागणीला दुजोरा देत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधीक्षक यांना कडक शब्दात तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची सूचना केली.

तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी घोटाळे संदर्भात माहिती देताना कधी ७९ कोटी, कधी ६० कोटी, तर कधी ४२ कोटी रुपयांचा घोटाळा झाला असल्याची संधीग्ध माहिती दिली होती याबाबत देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आक्रमकपणे प्रशासनाला महसूल मंत्र्यांसमोर झालेल्या बैठकीत जाब विचारला असता प्रशासन निरुत्तर झाले. नेमका किती कोटी रुपयांचा घोटाळा झाला या प्रश्नाचे उत्तर अद्याप पर्यंत प्रशासनाचा देता आलेले नाही ही बाब देखील आमदार लोणीकर यांनी महसूल मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

प्रशासनाने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार अनुदान वाटपात झालेल्या घोटाळ्याचे वर्गीकरण करत बोगस अनुदान लाटणारे, दुबार नावाने अनुदान लाटणारे, गायरान जमिनीवर अनुदान लाटणारे, कुठल्याही प्रकारची जमिनीची नोंद नसताना केवळ आधार कार्डावर नावाच्या आधारे अनुदान लाटणारे अशी तपासणी केली असून आतापर्यंत २४ कोटी रुपयांचा घोटाळा झाला असल्याची माहिती तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी दिली होती. परंतु या आकडेवारीत मोठी वाढ होऊन १०० कोटी रुपयांपर्यंत हा घोटाळा असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले होते.

आमदार बबनराव लोणीकर या संदर्भात म्हणाले की, महसूल प्रशासनाने अनुदान घोटाळ्यामध्ये सहभागी असलेल्या ग्राम महसूल अधिकारी अर्थात तलाठ्यांना तात्काळ निलंबित केले असून जिल्हा परिषद व कृषी विभागाने मात्र अद्याप दोषी ग्राम पंचायत अधिकारी अर्थात ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्यावर कुठलीही ठोस कारवाई केलेली नाही ही बाब अत्यंत गंभीर असून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशासनाने पाठीशी घालू नये ही बाब महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमोर निदर्शनास आणून दिल्यानंतर महसूल मंत्र्यांनी तात्काळ दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची सूचना केली.



तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी स्तरावर प्रलंबित असलेले सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना देखील महसूल मंत्री यांनी दिल्या. त्याचबरोबर घरकुलांना मोफत वाळू उपलब्ध करून देणे या विषयाला प्राधान्य देण्या संदर्भात देखील महत्त्वपूर्ण सूचना महसूल मंत्र्यांनी प्रशासनाला दिली. पांदण व शेत रस्ते या संदर्भात निधी उपलब्ध करून देऊन किमान १२ फुटाचे पक्के रस्ते देण्यासंदर्भात देखील महसूल मंत्र्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी सांगितले.

मेगा इंजिनिअरिंग कंपनीने कुणाचीही परवानगी न घेता परस्पर काढलेल्या गौण खनिज प्रकरणी लावलेला ५८ कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यासंदर्भात महसूल मंत्र्यांच्या प्रधान सचिवांना सूचना

शेगाव ते पंढरपूर दिंडी मार्गाच्या अनुषंगाने मेगा इंजिनिअरिंग कंपनीने कुठलीही खदान न घेता व कोणाचीही परवानगी न घेता परस्पर वाळू, दगड, मुरूम चोरी केली होती. त्या संदर्भाने तहसीलदार मंठा व परतुर यांनी मेगा इंजिनिअरिंग कंपनीला ५८ कोटी रुपयांचा दंड लावला होता. यापैकी केवळ १ टक्का रक्कम भरून जप्त केलेली वाहने सोडण्यासंदर्भात स्थगिती आदेश देण्यात आला होता. ही अत्यंत गंभीर बाब आमदार बबनराव लोणीकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर महसूल मंत्र्यांनी तात्काळ महसूल विभागाचे प्रधान सचिव यांना ही संपूर्ण दंडाची रक्कम तात्काळ वसूल करण्यासंदर्भात आदेश दिले अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी दिली.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.